# "रिझो" या सामाजिक संस्थेची गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती जाहीर.

## इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मिळणार लाभ

**पुणे, ता. २६ ऑगस्ट २०१४,**

"रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशन " (रिझो) या सामाजिक संस्थेमार्फत साल २०१४ पासून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी महाराष्ट्रातील गरजू विद्यार्थ्यांसाठी रुपये ५००० पर्यंतची विशेष शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

सदरची शिष्यवृत्ती देवांश मोगरेकर यांचे नावे सरू करण्यात आलेली असून प्रत्येक वर्षी किमान १५० पात्र विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक अथवा माध्यमिक शिक्षण घेत असलेला कोणीही विद्यार्थी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न दीड लाखापेक्षा कमी आहे असे विद्यार्थी अथवा त्यांचे पालक या शिष्यवृत्ती साठी अर्ज करू शकतात. इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना या विशेष शिष्यवृत्तीमुळे शिक्षणासाठी लाभ मिळणार आहे. दरवर्षी ८ ऑगस्ट रोजी या शिष्यवृत्तीचे वाटप केले जाईल. अशी माहिती "रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशन " (रिझो) चे संचालक श्री वैभव मोगरेकर व गौतमी बिडकर यांनी दिली.

पुढील शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज मिळविण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी ८४४६ ०३ ०००३ या क्रमांकावर साधावा असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. तसेच www.rostrumindia.org या संकेतस्थळावरून देखील या शिष्यवृत्तीसाठी अर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.